**ठाणे मानगरपालिका**

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

**वृत्तविशेष क्र. ११७** दिनांक : २ ऑक्टोंबर, २०११

# ठाणे भूषण, गौरव आणि गुणीजन पुरस्काराचे वितरण

## ठामपाचा २९ वा वर्धापनदिन दिमाखात साजरा

**ठाणे (२)** - ठाणे शहराच्या बदलत्या स्थित्यंतराचा मागोवा घेत आणि भविष्यात ठाणे शहर देशातल्या प्रमुख शहरांमध्ये ठाण्याची गणना होईल असा विश्वास व्यक्त करीत ठाणे महानगरपालिकेचा २९ वा वर्धापन दिन मोठ्या दिमाखात आणि उत्साहात साजरा झाला.

महापौर अशोक बारकू वैती यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सोहळ्याला शिवसेना ठाणे जिल्हा संपर्क आमदार एकनाथ शिंदे, आमदार राजन विचारे, प्रताप सरनाईक, आमदार संजय केळकर, महापालिका आयुक्त आयुक्त आर. ए. राजीव, शिवसेना उपजिल्हा प्रमुख नरेश म्हस्के, उपमहापौर मनोज लासे, स्थायी समिती सभापती गणेश साळवी, सभागृह नेते पांडुरंग पाटील, क्रीडा समिती सभापती संतोष वडवले, ज्येष्ठ नगरसेवक देवराम भोईर, मनोज शिंदे, संजय मोरे, दशरथ पालांडे, रमाकांत मढवी, अनिल सावे, अतिरिक्त आयुक्त एल. आर. गुप्ता आदी मान्यवर उपस्थित होते.

राम गणेश गडकरी रंगायतन येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झालेल्या या समारंभात मान्यवरांच्या हस्ते ठाणे भूषण, ठाणे गौरव आणि ठाणे गुणीजन पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यामध्ये शिवसेना ठाणे जिल्हा संपर्क प्रमुख आमदार एकनाथ शिंदे, आमदार राजन विचारे, प्रताप सरनाईक, आमदार संजय केळकर, महापालिका आयुक्त आयुक्त आर. ए. राजीव आदी मान्यवरांच्या हस्ते वैद्यकीय क्षेत्रात विलक्षण कामगिरी करणारे डॉ. किशोर भिसे, राज्य शासनाचे पहिले प्रमाणित रांगोळीकार त्र्यंबक जोशी, सरकारी नोकरीचा त्याग करून सामाजिक क्षेत्रात स्वतःला झोकून देणारे श्रीराम नानिवडेकर, सामाजिक सलोख्यासाठी अग्रभागी असणारे मोहम्मद जावेद हारून शेख आणि विश्वशांतीसाठी कार्यरत असणा-या सरला बेन आदी मान्यवरांचा ठाणे भूषण पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमात विविध क्षेत्रात उल्लेखनिय कामगिरी करणा-या २० ठाणेकर नागरिकांना ठाणे गौरव आणि ३९ नागरिकांना ठाणे गुणीजन पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी आपल्या भाषणात बोलताना शिवसेना ठाणे जिल्हा प्रमुख आमदार एकनाथ शिंदे यांनी भविष्यात ठाणे शहर देशातील प्रमुख शहरांमध्ये गणना होईल असा विश्वास व्यक्त केला. आमदार संजय केळकर आणि आमदार प्रताप सरनाईक यांनीही ठाणे शहराच्या आधुनिक प्रगतीचा आढावा घेतला तर महापौर अशोक बारकू वैती यांनी शहराच्या विकासाचा आलेख साकारला. महापालिका आयुक्त आर. ए. राजीव यांनी आपल्या प्रास्ताविकपर भाषणात ठाणे शहराच्या विकासात नागरिकांच्या सहभागाची अपेक्षा व्यक्त करून भविष्यातही नागरिकांच्या सहभागाने या शहराच्या विकासाची वाटचाल करता येईल असे सांगितले.

या समारंभानंतर ठाणे महानगरपालिकेच्या अधिकारी-कर्मचा-यांनी सादर केलेल्या 'अविष्कार-२०११' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

प्रारंभी सकाळी ९.३० वाजता महापालिका ध्वजाचे महापौर श्री. वैती यांच्या हस्ते ध्वजारोहण झाल्यानंतर महापौर अशोक बारकू वैती आणि महापालिका आयुक्त आर. ए. राजीव यांना अग्नीशमन आणि सुरक्षा दलाच्या जवानांनी संचलन करून मानवंदना दिली.

---

**फोटो ओळ:**

१. ठाणे महानगरपालिकेच्या २९ व्या वर्धापन दिनानिमित्त शिवसेना ठाणे जिल्हा प्रमुख आमदार एकनाथ शिंदे, प्रताप सरनाईक, आमदार संजय केळकर, महापालिका आयुक्त आयुक्त आर. ए. राजीव आदी मान्यवरांच्या हस्ते डॉ. किशोर भिसे, त्र्यंबक जोशी, श्रीराम नानिवडेकर, मोहम्मद जावेद हारून शेख आणि सरला बेन आदी मान्यवरांचा ठाणे भूषण पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

२. ठाणे महानगरपालिकेच्या अधिकारी-कर्मचा-यांनी सादर केलेल्या कार्यक्रमाची झलक.

# ठाणे महानगरपालिका

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

**वृत्तविशेष क्र.११८** दिनांक : ३ ऑक्टोबर, २०११.

## महापालिका लोकशाही दिनात ३९ निवेदने प्राप्त

**ठाणे ( ३ ) :** ठाणे महानगरपालिकेच्या आज झालेल्या लोकशाही दिनामध्ये नागरिकांच्या एकूण ३९ तक्रारी प्राप्त झाल्या. यावेळी महापालिका आयुक्तांनी २ प्रकरणावर अंतिम निर्णय दिला तर उर्वरीत प्रकरणांबाबत तातडीने अंतिम कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

या महापालिका लोकशाही दिनामध्ये सर्वाधिक तक्रारी अतिक्रमण विभागाशी निगडीत होत्या. एकूण ११ नागरिकांनी अतिक्रमण विभागाविषयी निवेदने सादर केली. तर शहर विकास विभाग-८, कर विभाग-२, सार्वजनिक बांधकाम विभाग-४, उपआयुक्त परिमंडळ-१ कार्यालय - ३, उपआयुक्त परिमंडळ-२ कार्यालय -३, महिती व जनसंर्पक विभाग -१, घनकचरा विभाग-१, अग्निशमन विभाग -१, शिक्षण मंडळ -१, समाज विकास विभागाशी संबंधित २ निवेदन होते.

यावेळी महापालिका आयुक्त श्री. राजीव यांनी सर्व प्रकरणांवर संबंधित विभाग प्रमुखांना एक महिन्याच्या आत अंतिम स्वरुपाची कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

---

**फोटो ओळ :** महापालिका लोकशाही दिनी नागरिकांची निवेदने ऐकताना महापालिका आयुक्त आर. ए. राजीव, नगर अभियंता के.डी.लाला, उपआयुक्त (मुख्यालय ) बालाजी खतगांवकर, उपआयुक्त दिपक चव्हाण, आरोग्याधिकारी आर.टी.केंद्रे, महापालिका अधिकारी व नागरिक.

# ठाणे महानगरपालिका

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

---

**वृत्तविशेष क्र.११९** दिनांक : ४ ऑक्टोबर, २०११.

## उथळसर व वर्तकनगर प्रभागात अनधिकृत बांधकाम व फेरीवाल्यांवर कारवाई

**ठाणे (४)** : ठाणे महापालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकामाविरुध्द करण्यात आलेल्या कारवाईत उथळसर प्रभाग समितींतर्गत खोपट, शिवसेना शाखेच्या बाजूला बांधकामधारक राजेश बामणे यांनी केलेले बामणे हाऊसच्यावरील पहिल्या मजल्याचे साईडचे व छतावरील लोखंडी पत्रे, आतील विटासिमेंटचे पक्के बांधकाम तोडण्यात आले. सदरची कारवाई महापालिका आयुक्त आर. ए. राजीव यांच्या आदेशानुसार करण्यात आली.

दरम्यान वर्तकनगर प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील रामचंद्रनगर, वैतीवाडी येथील श्री.यादव व श्री.पानसरे यांनी तळ अधिक ५ मजली इमारतीतील तळमजल्यावरील २५x१० मोजमापाचे अंतर्गत विट बांधकाम मनुष्यबळाच्या सहाय्याने तोडण्याची कारवाई करण्यात आली.

सदरची कारवाई उथळसर व वर्तकनगर प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त, प्रभाग अधिकारी आणि महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडील कर्मचा-यांनी पोलिस बंदोबस्तात पार पाडली.

---

# ठाणे मानगरपालिका

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

**वृत्तविशेष क्र. १२०** दिनांक : ७ ऑक्टोंबर, २०११

## मतदार व्हा हेल्पलाईनचे उद्घाटन संपन्न

**ठाणे (७)** : ठाणे महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांना मार्गदर्शन करण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या मतदार व्हा हेल्पलाईनचे औपचारीक उद्घाटन आज महापालिका आयुक्त आर. ए. राजीव व राज्य निवडणूक आयोगाचे अवर सचीव एम. व्ही. कानेड यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. सदरची हेल्पलाईन दिनांक ८ ऑक्टोबर, २०११ पासून पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होणार आहे. यावेळी महापालिका अतिरिक्त आयुक्त एल. आर. गुप्ता, निवडणुक विभागाचे उपआयुक्त बालाजी खतगावकर आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

आगामी सार्वत्रिक निवडणूकीसाठी राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार ठाणे महानगरपालिकेने मतदार नोंदणी हेल्पलाईन निर्माण केली असून या हेल्पलाईनच्या माध्यमातून मतदार यादी, मतदार नोंदणी, मतदार संघाविषयी माहिती नागरिकांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्याचबरोबर मतदार यादीत नाव नसल्यास, मतदार यादीत चूक असल्यास तसेच ओळखपत्र मिळाले नसल्यास मतदारांना आवश्यक ते मार्गदर्शन या हेल्पलाईनच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. याबाबत नागरिक ९२२५३२००७७ या हेल्पलाईनवर आपल्याला आवश्यक असलेली माहिती विचारु शकतील.

सदरची हेल्पलाईन उद्या शनिवार दिनांक ८ ऑक्टोंबरपासून सकाळी १० वाजलेपासून सुरू होत असून या क्रमांकावर एकाचवेळी दहा नागरिक माहितीसाठी संपर्क साधण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. उद्यापासून एक महिना ही हल्पलाईन कार्यरत राहणा-या या हेल्पलाईनवर नागरिक सोमवार ते शनिवार सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत संपर्क साधू शकतात.

---

फोटो ओळः मतदारांना मार्गदर्शन करण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या मतदार व्हा हेल्पलाईनचे औपचारीक उद्घाटन आज महापालिका आयुक्त आर. ए. राजीव व राज्य निवडणूक आयोगाचे अवर सचीव एम. व्ही. कानेड यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी यावेळी महापालिका अतिरिक्त आयुक्त एल. आर. गुप्ता, निवडणुक विभागाचे उपआयुक्त बालाजी खतगावकर आणि इतर अधिकारी उपस्थित होते.

# ठाणे मानगरपालिका

माति व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

**वृत्तविशेष क्र. १२१** दिनांक : ७ ऑक्टोंबर, २०११.

# ठाणे महापौर चषक अ. भा. मानांकन टेबल टेनिस स्पर्धा आजपासून

**ठाणे (७) :** ठाणे महानगरपालिका आणि ठाणे जिल टेबल टेनिस संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने दादोजी कोंडदेव क्रीडा प्रेक्षागृह येथे उद्या दिनांक ८ ऑक्टोबर, २०११ पासून सकाळी १०.३० वाजलेपासून ठाणे महापौर चषक अखिल भारतीय मानांकन टेबल टेनिस स्पर्धेला होणार असून या स्पर्धेतून आगामी आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व करणा-या संघाची निवड चाचणी तसेच सन २०१२ साली लंडन येथे होणा-या ऑलिम्पिक स्पर्धेचा संघ निवडण्यात येणार आहे.

उद्या सकाळी १०. ३० वाजता महापौर अशोक बारकू वैती यांच्या अध्यक्षतेखाली सुरू होणा-या या स्पर्धेत पंजाब, राजस्थान, उत्तरप्रदेश, हरियाणा, दिल्ली, हिमाचल प्रदेश, झारखंड, बिहार, आसाम, पश्चिमबंगाल, उडिसा, मणिपूर, गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, केरळ, गोवा, पाँडेचरी, महाराष्ट्र राज्यातील अनेक आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय खेळाडू सहभागी होणार आहेत. सदर स्पर्धा कॅडेट बॉईज सिंगल्स, कॅडेट गर्ल्स सिंगल्स, सब ज्युनिअर्स बॉईज सिंगल्स, सब ज्युनिअर्स गर्ल्स सिंगल्स, ज्युनिअर्स बॉईज सिंगल्स, ज्युनिअर्स गर्ल्स सिंगल्स, युथ बॉईज सिंगल्स, युथ गर्ल्स सिंगल्स, मेन्स सिंगल्स, वूमेन सिंगल्स अशा एकूण दहा गटांमध्ये खेळवली जाणार आहे.

या स्पर्धेच्या उद्‌घाटन प्रसंगी प्रख्यात आंतरराष्ट्रीय टेबल टेनिसपटू व अर्जुन पुरस्कर्ते कमलेश मेहता व अर्जुन पुरस्कर्ती सौ.मोनालिसा मेहता हे उपस्थित राहणार आहेत. तसेच कॅडेट व सब-ज्युनिअर गटांचा बक्षिस वितरण समारंभ दि. ९ ऑक्टोबर, २०११ रोजी सायंकाळी ७.३० वाजता व इतर आठ गटांचा बक्षिस समारंभ दि. १३ ऑक्टोबर, २०११ रोजी सायंकाळी ५.३० वाजता शिवसेना ठाणे जिल्हा प्रमुख आमदार एकनाथ शिंदे, आमदार संजय केळकर, आमदार राजन विचारे, प्रताप सरनाईक, आमदार जितेंद्र आव्हाड, महापालिका आयुक्त आयुक्त आर. ए. राजीव, उपमहापौर मनोज लासे, स्थायी समिती सभापती गणेश साळवी, सभागृह नेते पांडुरंग पाटील, विरोधी पक्षनेते नजीब मुल्ला, क्रीडा समिती सभापती संतोष वडवले आदी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

---


**ठाणे मानगरपालिका**

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

**वृत्तविशेष क्र. १२२** दिनांक : ८ ऑक्टोंबर, २०११.

## महापालिकेने क्रीडा परंपरा जोपासली - महापौर श्री. वैती

### ठाणे महापौर चषक अ. भा. मानांकन टेबल टेनिस स्पर्धेचे उद्घाटन

**ठाणे (८) :** क्रीडा परंपरा जोपसण्याबरोबरच ती वृंधीगत करण्याचे काम ठाणे महानगरपालिकेने केले असल्याचे उद्गार ठाण्याचे प्रथम नागरिक महापौर अशोक बारकू वैती यांनी काढले. ठाणे महानगरपालिका आणि ठाणे जिल्हा टेबल टेनिस संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने दादोजी कोंडदेव क्रीडा प्रेक्षागृह येथे आयोजित करण्यात आलेल्या महापौर चषक अखिल भारतीय मानांकन टेबल टेनिस स्पर्धेच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते.

यावेळी पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, टेबल टेनिस स्पर्धेतून भारताचा संघ निडण्यात येणार आहे ही आमच्यासाठी अनंदाची आणि अभिमानाची गोष्ट असून अशा स्पर्धेतून खेळाडूंची नवी पिढी घडविण्याचे काम महापालिका करीत आहे. यावेळी प्रख्यात आंतरराष्ट्रीय टेबल टेनिसपटू व अर्जुन पुरस्कर्ते कमलेश मेहता व अर्जुन पुरस्कर्ती सौ.मोनालिसा मेहता, उपमहापौर मनोज लासे, सभागृह नेते पांडुरंग पाटील, क्रीडा समिती सभापती संतोष वडवले.महाराष्ट्र व ठाणे जिल्हा टेबल टेनिस असोशिएशनचे अध्यक्ष सतीश प्रधान आदी मान्यवर उपस्थित होते.

सदर स्पर्धा १३ ऑक्टोंबरपर्यंत चालणार असून कॅडेट व सब-ज्युनिअर गटांचा बक्षिस वितरण समारंभ दि. ९ ऑक्टोबर, २०११ रोजी सायंकाळी ७.३० वाजता व इतर आठ गटांचा बक्षिस समारंभ दि. १३ ऑक्टोबर, २०११ रोजी सायंकाळी ५.३० वाजता शिवसेना ठाणे जिल्हा प्रमुख आमदार एकनाथ शिंदे, आमदार संजय केळकर, आमदार राजन विचारे, प्रताप सरनाईक, आमदार जितेंद्र आव्हाड, महापालिका आयुक्त आयुक्त आर. ए. राजीव, उपमहापौर मनोज लासे, स्थायी समिती सभापती गणेश साळवी, सभागृह नेते पांडुरंग पाटील, विरोधी पक्षनेते नजीब मुल्ला, क्रीडा समिती सभापती संतोष वडवले आदी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.

---

**फोटो ओळ**: ठाणे महानगरपालिका आणि ठाणे जिल टेबल टेनिस संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने दादोजी कोंडदेव क्रीडा प्रेक्षागृह येथे महापौर चषक अखिल भारतीय मानांकन टेबल टेनिस स्पर्धेचे उद्घाटन करताना महापौर अशोक बारकू वैती सोबत आंतरराष्ट्रीय टेबल टेनिसपटू व अर्जुन पुरस्कर्ते कमलेश मेहता व अर्जुन पुरस्कर्ती सौ.मोनालिसा मेहता, उपमहापौर मनोज लासे, सभागृह नेते पांडुरंग पाटील, क्रीडा समिती सभापती संतोष वडवले.महाराष्ट्र व ठाणे जिल्हा टेबल टेनिस असोशिएशनचे अध्यक्ष सतीश प्रधान.

**ठाणे महानगरपालिका**
माहिती व जनसंपर्क विभाग
E-mail - publicrelationtmc@gmail.com

**वृत्तविशेष क्र.१२२** दिनांक : १५ ऑक्टोबर, २०११.

# सोमवारी वागळे व रायलादेवी प्रभाग समिती क्षेत्राचा पाणी पुरवठा बंद राहणार

**ठाणे (१५) :** ठाणे महानगरपालिकेच्या वागळे व रायलादेवी प्रभाग समिती अंतर्गत इंदिरानगर संप येथे इनलेट जलवाहिनीच्या जोडणीचे कामासाठी शटडाऊन घेण्यात येणार असल्याने सोमवार दिनांक १७ ऑक्टोबर, २०११ रोजी सकाळी ९.०० ते मंगळवार दिनांक १८ ऑक्टोबर, २०११ रोजी सकाळी ९.०० या कालावधीत पाणी पुरवठा बंद राहणार आहे. या कालावधीत वागळे व रायलादेवी कार्यक्षेत्रातील लोकमान्यनगर, इंदिरानगर, साठेनगर, सावरकरनगर, रुपादेवी पाडा, रामनगर, कैलासनगर, सी.पी.तलाव, श्रीनगर, किसननगर व शांतीनगर परिसराचा पाणी पुरवठा बंद राहणार आहे.

या शटडाऊनमुळे पुढील दोन दिवस कमी दाबाने पाणी पुरवठा होणार असून, नागरिकांनी पालिकेस सहकार्य करावे असे आवाहन पाणी पुरवठा विभागाने या प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

---

**ठाणे महानगरपालिका**

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

**वृत्तविशेष क्र.१२३** दिनांक : १५ ऑक्टोबर, २०११.

# ठाणे महानगरपालिकेच्यावतीने वृध्द दिनाचे आयोजन
# ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान ; सांस्कृतिक कार्यक्रमाची मेजवानी

**ठाणे (१५) :** जागतिक वृध्द दिनाचे औचित्य साधून ठाणे महानगरपालिकेच्यावतीने आणि मध्यवर्ती ज्येष्ठ नागरिक संघटनेच्यासहकार्याने दिनांक २० ऑक्टोबर, २०११ रोजी वृध्द दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महापौर अशोक बारकू वैती यांनी दिली आहे.

राम गणेश गडकरी रंगायतन येथे सकाळी ११.३० वाजता हा समारंभ होणार असून या समारंभाला शिवसेना ठाणे जिल्हा प्रमुख आमदार एकनाथ शिंदे, सर्वश्री खासदार संजीव नाईक, आनंद परांजपे, सर्वश्री आमदार राजन विचारे, प्रताप सरनाईक, जितेंद्र आव्हाड, संजय केळकर, सुभाष भोईर, महापालिका आयुक्त आर. ए. राजीव, उपमहापौर मनोज लासे, स्थायी समिती सभापती गणेश साळवी, सभागृह नेते पांडुरंग पाटील, विरोधी पक्षनेते नजीब मुल्ला, क्रीडा समिती सभापती संतोष वडवले आणि ज्येष्ठ नागरिकं संघटनेचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

या निमित्ताने उल्लेखनिय कामगिरी करणा-या ज्येष्ठ नागरिकांचा ठाणे महानगरपालिकेच्या वतीने सत्कार करण्यात येणार असून त्यानंतर 'भावरंग' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमामध्ये प्रसिध्द गायिका सौ. सायली तळवलकर आणि प्रसिध्द गायक मंदार आपटे हे कलाकार आपली कला सादर करणार आहेत. तरी नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन ठाणे महानगरपालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

---

# महापौर चषक अखिल भारतीय टेबल टेनिस मानांकन स्पर्धा पुरुष गटात ॲन्थनी राज तर महिला गटात के.शामिनी विजेते

**ठाणे (१५) :** ठाणे महानगरपालिका आणि ठाणे जिल्हा टेबल टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने टेबल टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या महापौर चषक अखिल भारतीय टेबल टेनिस स्पर्धेच्या पुरुष एकेरी गटात ॲन्थनी अमल राज आणि महिला एकेरी गटात के.शामिनी हे विजेते ठरले. सर्व विजेत्यांना महापौर अशोक बारकू वैती यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले.

दिनांक ८ ऑक्टोबर पासून १३ ऑक्टोबर, २०११ पर्यंत महानगरपालिकेच्या कै.खंडू रांगणेकर बॅडमिंटन कोर्टमध्ये अखिल भारतीय टेबल टेनिस मानांकन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेच्या पुरुष (एकेरी) गटात पीएसपीबीच्या ॲन्थनी अमल राज याने पीएसपीबीच्या सौम्यदीप रॉय याचा ११/६, ११/३, ११/८, ११/ असा सरळ सेटस्ने पराभव करुन विजेतेपद पटकाविले. तर महिला (एकेरी) गटात पीएसपीबीच्या के. शामिनी हिने पीएसपीबीच्याच मौसमी पॉल हिचा ११/५, ११/५, ११/६, ९//११, ११/७ अशा सेटस्ने पराभव केला.

या स्पर्धेतील सर्व विजेत्यांना महापौर अशोक बारकू वैती यांचा हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. यावेळी ठाणे जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष सतीश प्रधान, सभागृह नेते पांडुरंग पाटील, क्रीडा समिती सभापती संतोष वडवले, नगरसेवक राम रेपाळे, रमाकांत मढवी, टेबल टेनिस संघटनेचे सचिव यतीन टिपणीस आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेचा तपशिलवार निकाल खालीलप्रमाणे -

१) **कॅडेट गर्लस् (एकेरी)**
दत्ता मोमिता (प.बंगाल) विजेती विरुध्द वरुणी जैसवाल (आंध्र प्रदेश)

२) **कॅडेट बॉईज (एकेरी)**
आकाश नाथ (प.बंगाल) विजेता विरुध्द मानव ठक्कर (गुजरात)

३) **सब-ज्युनिअर बॉईज (एकेरी)**
बोरो बेर्डी (पीएसपीबी-ए) विजेता विरुध्द लालहुनलुआ (पीएसपीबी-ए)

४) **सब-ज्युनीअर गर्लस्**
सुमना शहा (प.बंगाल) विजेती विरुध्द ए. श्रीजा (आंध्र प्रदेश)

२/-



५) **ज्युनिअर गर्लस् (एकेरी)**
टी. रिथ रिश्या (तामिळनाडू) विजेती विरुध्द मानिका बात्रा (दिल्ली)

६) **ज्युनिअर बॉईज (एकेरी)**
ग्रोव्हर सुध्दांशू (पीएसपीबी) विजेता विरुध्द शुभंकर रेणवीकर (एअर इंडिया)

७)  **युथ गर्लस् (एकेरी)**

मानिका बात्रा (दिल्ली) विजेती विरुध्द आर. कृष्णन सुमना (आयबी)

८)  **युथ बॉईज् (एकेरी)**

जी. सथ्यन (पीएसपीबी) विरुध्द व्ही. नितीन थिरुवेंगडम् (पीएसपीबी)

---

**फोटो ओळ :** ठाणे महानगरपालिका आणि ठाणे जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने ठाणे महापौर चषक अखिल भारतीय मानांकन टेबल टेनिस स्पर्धेचा पुरस्कार वितरण समारंभ महापौर अशोक बारकू वैती यांच्या हस्ते पार पडला. यावेळी टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष सतीश प्रधान, सभागृह नेते पांडुरंग पाटील, क्रीडा समिती सभापती संतोष वडवले, नगरसेवक राम रेपाळे, रमाकांत मढवी, टेबल टेनिस संघटनेचे सचिव यतीन टिपणीस आदी मान्यवर उपस्थित होते.

**ठाणे महानगरपालिका**

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

**वृत्तविशेष क्र. १२५**  दिनांक : १७ ऑक्टोबर, २०११.

## ठामपाची प्रदुषण नियंत्रण नियमावली मंजूर

## दंडात्मक कारवाईची तरतुद ; महासभेची मान्यता

**ठाणे (१७) :** ठाणे महानगरपालिकेच्या प्रदुषण नियंत्रण मंडळाने तयार केलेल्या प्रदुषण नियंत्रण नियमावलीस महासभेने मान्यता दिली असून या नियंत्रण नियमावलींतर्गत किमान ५ हजार रुपयांपासून ते कमाल २५ हजार रुपयांची दंडात्मक कारवाईची तरतुद प्रस्तावित करण्यात आली आहे.

दरम्यान संबंधित ठेकेदारावर तीन वेळा दंडात्मक कारवाई झाल्यानंतर त्यांचा परवाना रद्द करण्याची तरतुदही या नियंत्रण नियमावलीत प्रस्तावित करण्यात आली असल्याने आता शहरातील स्थापत्य कामे, बांधकामे, आरएमसी प्लान्ट, खडी, रेती, वाहतुक आदी माध्यमातून होणा-या प्रदुषणास आळा बसण्यास मदत होणार आहे.

यामध्ये रेती, माती, सिमेंट, दगड, खडी वाहतुक करताना विशिष्ट प्रकारचा डंपर वापरणे व त्यास आच्छादन करणे तसे न झाल्यास विकासक, उद्योग वापर यासाठी २५ हजार रुपये दंड, ठेकेदारास ५ हजार तर घरगुती वापरासाठी १ हजार रुपये दंड, इमारत व्यावसायिकांनी संरक्षक नेट न बांधल्यास, संरक्षक भिंत न उभारल्यास, धुळीचे प्रदुषण रोखण्यासाठी वॉटर स्प्रींकलरची व्यवस्था न केल्यास १५ हजार रुपये दंडाची तरतुद करण्यात आली आहे. तर ठेकेदारास ५ हजार रुपये दंडाची तरतुद करण्यात आली आहे.

उंच इमारतीचे बांधकाम करताना, विविध स्थापत्य कामे, कामगार कॉलनीमधील साफसफाई, वायू प्रदुषण, ध्वनी प्रदुषण आदीबाबत महापालिकेने नियमावली तयार केली असून यामध्ये विकासक, बांधकामधारक, ठेकेदार आणि वैयक्तिक अशा पातळीवर १ हजार रुपयांपासून ते २५ हजार रुपयांपर्यंत दंडात्मक कारवाईची तरतुद प्रस्तावित केली जाईल. यामध्ये शहरातील सर्व उद्योगधंदे, सर्व आस्थापना, आरएमसी प्लान्ट आदींना या नियंत्रणाखाली आणण्यात आले आहे.

---

**ठाणे महानगरपालिका**
माहिती व जनसंपर्क विभाग
E-mail - publicrelationtmc@gmail.com

---

**वृत्तविशेष क्र. १२६** दिनांक : २१ ऑक्टोबर, २०११.

## फटाके वाजवा. . . पण पर्यावरणाची व आरोग्याचीही काळजी घ्या !

## महापालिकेचे नागरिकांना आवाहन

**ठाणे (२१)** : सप्तरंगात न्हाऊ घालत आणि आनंदाची बरसात करीत येणा-या दिवाळीचा आनंद द्विगुणीत करण्यासाठी फटाक्यांची आतषबाजी करणा-या नागरिकांसाठी ठाणे महानगरपालिकेने कळकळीचे

आवाहन केले आहे. 'फटाके वाजवा...पण पर्यावरणाची आणि आरोग्याचीही काळजी घ्या' असा संदेश महापालिकेच्यावतीने ठाणेकर नागरिकांना देण्यात आला आहे.

या संदर्भात ठाणे महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाने दिलेल्या प्रसिध्दीपत्रकात फटाके इमारतींपासून दूर मोकळया जागेत लावावेत, फुलबाजा शरीरापासून लांब ठेवावा, फटाके लावताना घट्ट सुती कपडे घालावेत, बाल्कनी व गॅलरीमधील जळाऊ सामान दूर ठेवणे आदी महत्वाच्या सूचनांबरोबरच फटाके, मेणबत्ती किंवा तेलाचे दिवे घरात लावू नयेत, फटाका पेटल्यानंतर त्याच्या जवळ जाऊ नये, अनार, पाऊस यासारखे फटाके हातात घेऊन लाऊ नयेत, रॉकेट सारखे उडणारे फटाके लावू नयेत, आगीच्याजवळ फटाक्यांचा साठा करु नये, विद्युत जोडणीवर क्षमतेपेक्षा जास्त लोड देऊ नये अशा महत्वाच्या सूचना दिल्या आहेत..

दरम्यान वैयक्तिक सूचनांबरोबर गृहनिर्माण सोसायटयांसाठीही अग्निशमन दलाने महत्वाच्या टिप्स दिल्या असून त्यामध्ये अग्निशमन उपकरणे कार्यक्षम व सुस्थितीत ठेवणे, संकटकाळी बाहेर पडण्याचे मार्ग, जीने, रिफ्युज एरिया तसेच आगीचे इशारे देणारे भोंगे आदींची माहिती घेणे, आग लागल्यास उद्वाहन (लिफ्ट) चा वापर करु नये, अग्नि सुरक्षिततेच्या सूचना इमारतीत स्पष्ट दिसतील अशा ठिकाणी लावणे, अग्निशमन दलाची वाहने इमारतीजवळ त्वरीत पोहचतील यासाठी मार्गिका मोकळया राहतील याची काळजी घेणे अशा सूचनांचा समावेश आहे.

आपले आरोग्य आणि पर्यावरण यासाठी दिवाळीत फटाके उडविताना आवश्यक ती काळजी घेण्याचे आवाहन ठाणे महानगरपालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

---


**ठाणे महानगरपालिका**

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

**वृत्तविशेष क्र. १२८** दिनांक : २२ ऑक्टोबर, २०११.

## 'हॉप अॅन्ड शॉप' अभिनव योजनेचा आज शुभारंभ

# महापौर अशोक वैती यांच्या हस्ते शुभारंभ

**ठाणे (२२)** : ऐन दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर दिवाळीच्या खरेदीचा आनंद मनसोक्त लुटता यावा यासाठी ठाणे महानगरपालिकेच्या परिवहन सेवेने 'हॉप अॅन्ड शॉप' ही अभिनव कल्पना साकारली असून उद्या रविवार दिनांक २३ ऑक्टोबर, २०११रोजी सकाळी ११.३० वाजता ठाण्याचे प्रथम नागरिक महापौर अशोक बारकू वैती यांच्या शुभहस्ते या योजनेचा प्रारंभ होत आहे.

महापौर अशोक बारकू वैती आणि महापालिका आयुक्त यांच्या संकल्पनेतून साकार झालेल्या या योजनेचा शुभारंभ कोरम मॉल या ठिकाणी होत असून या कार्यक्रमाला उपमहापौर मनोज लासे, स्थायी समिती सभापती गणेश साळवी, सभागृह नेते पांडुरंग पाटील, विरोधी पक्षनेते नजीब मुल्ला, महापालिका आयुक्त आर. ए. राजीव, क्रीडा समिती सभापती संतोष वडवले, परिवहन समिती सभापती जितेंद्रकुमार इंदिसे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या संदर्भात आपली प्रतिक्रिया व्यक्त करताना महापौर श्री. वैती यांनी या योजनेमुळे सर्वसामान्य ठाणेकरांना दिलासा मिळणार असून त्यांना एकाच तिकीटात दिवसभर कोणत्याही मॉलमध्ये जाऊन खरेदीचा आनंद लुटता येणार आहे तर महापालिका आयुक्त आर. ए. राजीव यांनी या योजनेमुळे खरेदीनंतर नागरिकांची जी कुचंबना होते ती थांबेल असे सांगितले.

'हॉप अॅन्ड शॉप' बससेवा दोन मार्गांवर चालविण्यात येणार असून ती शहरातील सर्व शॉपिंग मॉल्संना जोडण्यात आली आहे. ही विशेष बससेवा दर अध्यातासांनी सुटून नागरिकांना सेवा देणार आहे.

'हॉप अॅन्ड शॉप' बसेसमधून प्रवास करण्याकरीता रु.२२/- इतका तिकीट दर निश्चित केला असून हे तिकीट प्रवाश्यांना एकदाच खरेदी करायचे आहे. या तिकीटावर त्यांना एका मॉलपासून दुस-या मॉलपर्यंत संपूर्ण दिवसभर प्रवास करता येईल. मात्र सदर तिकिटाद्वारे इतर सर्वसाधारण बसमधून प्रवास करता येणार नाही. दिवाळीच्या सणाकरीता नागरिकांसाठी दिनांक २३ ते २९ ऑक्टोबर, २०११ या कालावधीत ही बससेवा दररोज चालविण्यात येणार असून त्यानंतर फक्त रविवारी ही बससेवा सुरू ठेवण्यात येणार असून सदर बससेवा सकाळी ११.०० ते रात्रौ ११.०० या वेळेत नागरिकांसाठी चालू राहणार असून नागरिकांनी सदर बससेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन महापालिकेच्या परिवहन सेवेमार्फत करण्यात आले आहे.

---

**ठाणे महानगरपालिका**
माहिती व जनसंपर्क विभाग
E-mail - publicrelationtmc@gmail.com

**वृत्तविशेष क्र. १२९** दिनांक : २३ ऑक्टोबर, २०११.

## <u>ठाणे परिवहनची 'हॉप अॅन्ड शॉप' योजना</u>
## महापौर श्री. वैती यांची ठाणेकरांना दिवाळीची अनमोल भेट

**ठाणे (२३)** : ठाणे महानगरपालिकेने परिवहन सेवेच्या माध्यमातून ऐन दिवाळीच्या शुभ मुहूर्तावर दिवाळीच्या खरेदीचा आनंद मनसोक्त लुटता यावा यासाठी 'हॉप एन शॉप' या योजनेची अनमोल भेट आज महापौर अशोक बारकू वैती यांनी ठाणेकरांना दिली. वेळ, पैसा आणि इंधन याची बचत करतानाच केवळ २२ रूपयांत शहरातील सर्व मॉल्समधून खरेदीचा आनंद लुटण्याची अनोखी संधी यानिमित्ताने नागरिकांना मिळाली आहे.

कोरम मॉल येथे आज सकाळी ११.३० वाजता ठाण्याचे प्रथम नागरिक महापौर अशोक बारकू वैती यांच्या शुभहस्ते आणि आमदार प्रताप सरनाईक यांच्या उपस्थितीत या योजनेचा शुभारंभ झाला. यावेळी अतिरिक्त आयुक्त एल. आर. गुप्ता, परिवहन व्यवस्थापक दिपक चव्हाण, माहिती व जनसंपर्क अधिकारी संदीप माळवी आदी उपस्थित होते.

या योजनेच्या पार्श्वभूमीवर आमदार प्रताप सरनाई यांनी ही योजना म्हणजे नागरिकांसाठी महापालिकेने केलेली मोठी सोय असल्याचे उद्‌गार काढले. महापौर अशोक बारकू वैती यांनी आपल्या मनोगतामध्ये खरेदीनंतर नागरिकांची होणारी गैरसोय टाळण्यासाठी ही योजना महत्वाची आहे असे सांगून नागरिकांनी मोठ्या प्रमाणात या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले.दिवाळीच्या काळात नागरिकांसाठी दिनांक २३ ते २९ ऑक्टोबर, २०११ या कालावधीत सकाळी ११.०० ते रात्रौ ११.०० या वेळेत ही विशेष बससेवा दररोज चालविण्यात येणार असून असून दिवाळीनंतर दर रविवारी ही सेवा नागरिकांना उपलब्ध करून दिली जाईल असेही महापौर अशोक बारकू वैती यांनी सांगितले.

'हॉप अॅन्ड शॉप' बससेवा दोन मार्गांवर चालविण्यात येणार आहे. यामध्ये मार्ग क्रमांक एकमध्ये वृंदावन सोसायटी ते वृंदावन सोसायटी - मार्गे - खोपट, हरि निवास, तीनहात नाका (इटर्निटी मॉल), कोरम मॉल, वर्तकनगर, देवदयानगर, गांधीनगर, (रिलायन्स मॉल), वसंत विहार, खेवरा सर्कल (डी-मार्ट मॉल), मानपाडा, कासारवडवली (हायपर सिटी मॉल), वाघबीळ नाका, हिरानंदानी, स्वस्तिक पार्क, ब्रम्हांड, आझादनगर, मानपाडा लॉकिम (मोर मेगा स्टोअर), सिनेवंडर, कापुरबावडी (बीग बझार), लेक सिटी मॉल, कॅसल मिल, वृंदावन सोसायटी). तर मार्ग क्र.२ मध्ये वृंदावन सोसायटी ते वृंदावन सोसायटी - मार्गे - श्रीरंग सोसायटी, कॅसल मिल, माजिवडा, कापुरबावडी (बीग बझार, लेक सिटी मॉल), सिनेवंडर, लॉकिम (मोर मेगा स्टोअर), मानपाडा, कासारवडवली (हायपर सिटी), वाघबीळ नाका, हिरानंदानी, ॠतू टॉवर, स्वस्तिक पार्क, ब्रम्हांड, आझादनगर, मानपाडा, खेवरा सर्कल (डी-मार्ट मॉल), वसंत विहार, गांधीनगर (रिलायन्स मॉल), ओसवाल पार्क, वीवा सीटी कॉल, कॅडबरी, कोरम मॉल, नितीन कंपनी, तीनहात नाका (इटर्निटी मॉल), हरि निवास, वृंदावन सोसायटी या ठिकाणांचा समावेश आहे. या दोन्ही मार्गांवर रोज एकूण २२ बसफे-या होणार आहेत. तरी नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन महानगरपालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

---

**फोटो ओळ :** ठाणे परिवहन सेवेतर्फे सुरू करण्यात आलेल्या हॉप एन शॉप योजनेचा शुभारंभ करताना महापौर अशोक बारकू वैती. सोबत आमदार प्रताप सरनाईक, अतिरिक्त आयुक्त एल. आर. गुप्ता, परिवहन व्यवस्थापक दिपक चव्हाण, माहिती व जनसंपर्क अधिकारी संदीप माळवी आदी.

**ठाणे महानगरपालिका**
माहिती व जनसंपर्क विभाग
E-mail - publicrelationtmc@gmail.com

**वृत्तविशेष क्र.१३०** दिनांक : २४ ऑक्टोबर, २०११.

## ठाणे महापालिकेच्या जकात विभागाची कामगिरी
## जकातीची चोरी पकडली

**ठाणे (२४)** : महापालिकेची दिशाभूल करुन चुकीचा मार्गस्थ दाखला बनवून जकात चोरी करणा-या मे.कल्पतरु प्रॉपर्टीज प्रा.लि. यांच्या मालासह दोन वाहने ठाणे महापालिकेच्या जकात विभागाने जप्त केली असून मुळ जकातीसह दहापट दंडासह एकूण ८,७०,००० रुपयांची जकात वसुली करण्याची कार्यवाही महापालिकेमार्फत करण्यात येत आहे. सदरची कार्यवाही महापालिका आयुक्त आर. ए. राजीव यांच्या आदेशान्वये करण्यात आली.

दिनांक १९ ऑक्टोबर, २०११ रोजी मे. कल्पतरु प्रॉपर्टीज प्रा. लि. यांनी मानपाडा येथे बांधकामासाठी वाहन क्र.एमएच-०४-एफ ४०६५ व एमएच-४६ एच १६६० या वाहनांद्वारे लोखंडी सळयांची आयात करुन हा माल मुंबई येथे जात असल्याची बनावट देयके तयार करुन मार्गस्थ दाखला मिळविला. परंतू महापालिकेच्या जकात तपासणीस यांना सदरची वाहने माजिवडा येथे उभी असल्याचे निदर्शनास आली व याबाबत संशय आल्याने त्यांनी पाळत ठेवली असता काही तासाने सदरची वाहने घोडबंदरच्या दिशेने मार्गस्थ होऊन कल्पतरु हिल्स येथील साईटवर माल उतरविण्यासाठी उभी असल्याचे आढळून आले. वाहनांतील मालाच्या कागदपत्रांची तपासणी केली असता, आयात केलेल्या मालाचे मुल्य रु.१९,७८,८७०/- असून या मालावरील जकात रु. ७९,१५५/- इतकी होत असून दंडासह एकूण रु.८,७०,७०५/- इतकी रक्कम वसुल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सद्यःस्थितीत दोन्ही वाहने मालासह जप्त करण्यात आली आहेत.

सदरची कार्यवाही जकात विभागाचे उपआयुक्त दिपक चव्हाण, जकात अधिक्षक झुंजार परदेशी, जकात तपासणीस रंगराव पाटील, शिवराम वाघ यांनी पार पाडली.

**ठाणे महानगरपालिका**

माहिती व जनसंपर्क विभाग

**वृत्तविशेष क्र.१३१** दिनांक : ३१ ऑक्टोबर, २०११.

# ठाणे महापौर चषक छायाचित्र स्पर्धा 'अविष्कार-२०११' आजपासून कला भवन येथे भव्य प्रदर्शनाचे आयोजन

**ठाणे (३१) :** ठाणे महानगरपालिकेच्यावतीने आणि फोटो सर्कलच्या सहकार्याने आयोजित 'अविष्कार २०११' ठाणे महापौर चषक छायाचित्र स्पर्धा व प्रदर्शनाचे उद्यापासून ठाणे शहराचा लॅण्डमार्क असलेल्या ठाणे कला भवनमध्ये आयोजन करण्यात आले आहे. दिनांक १ नोव्हेंबर, २०११ रोजी सायंकाळी ६.०० वाजता शिवसेना ठाणे जिल्हा प्रमुख आमदार श्री. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे उद्घाटन होत आहे.

या समारंभास महापौर अशोक बारकू वैती, उपमहापौर मनोज लासे, स्थायी समिती सभापती गणेश साळवी, सभागृह नेते पांडुरंग पाटील, विरोधी पक्षनेते नजीब मुल्ला, क्रीडा समिती सभापती संतोष वडवले आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या निमित्ताने प्रदर्शन कालावधी दरम्यान युवराज गुर्जर (आफ्रीकन वाईल्ड लाईफ), अंजेलो डिसिल्वा (रोम-स्विडन), शिरीष साने (वारी), वेदवती पडवळ (इंडीयन वाईल्ड लाईफ) आदी मान्यवर छायाचित्रकारांच्या स्लाईड-शोचे आयोजन सायंकाळी ६.३० वाजता ठाणे कला भवन येथे करण्यात येणार आहे. तरी ठाणे कला भवन येथे होणा-या 'अविष्कार-२०११' या कार्यक्रमाला नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन ठाणे महानगरपालिका व फोटो सर्कल सोसायटीच्यावतीने करण्यात आले आहे.

दरम्यान हया निमित्ताने राज्यस्तरीय 'संधीप्रकाश, पाणी वाचवा आणि आकृतीबंध' आणि ठाणे जिल्हयासाठी 'ग्रामीण जीवन' या विषयांवर छायाचित्र स्पर्धाही आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे.

**संधीप्रकाश :** संदीप यादव - प्रथम, प्रमोद पाटील - द्वितीय, मयुर खोले - तृतीय, उत्तेजनार्थ - विनय चव्हाण, उमेश साळगांवकर.

**पाणी वाचवा :** सुजीत म्हात्रे - प्रथम, प्रवीण ठाकरे - द्वितीय, सुजीत म्हात्रे - तृतीय, उत्तेजनार्थ - नितांत पाटील, अभिजीत सुर्वे.

**आकृतीबंध :** स्वप्नाली मठकर - प्रथम, उमेश साळगांवकर - द्वितीय, स्वप्नाली मठकर - तृतीय, उत्तेजनार्थ - राहुल सुर्वे, अर्चना जोशी.

**ग्रामीण जीवन (ठाणे जिल्हा राखीव) :** सुजीत म्हात्रे - प्रथम, अजय महाजन - द्वितीय, वैभव जागुष्टे - तृतीय, उत्तेजनार्थ - महेंद्र बेंद्रे, अजय महाजन.

# ठाणे महानगरपालिका

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

**वृत्तविशेष क्र. १ ३ २** दिनांक : ३१ ऑक्टोंबर, २०११.

## ठाणे परिवहनच्या सहा कर्मचा-यांवर निलंबनाची कारवाई

**ठाणे ( ३ १ ) :** कामचुकारपणा करून आराम करणा-या ठाणे परिवहन सेवेच्या सहा कर्मचा-यांवर आज निलंबनाची कठोर कारवाई करण्यात आली. परिवहन व्यवस्थापप दिपक चव्हाण यांनी ही कारवाई केली.

परिवहन व्यवस्थापक श्री. चव्हाण यांनी काल दिनांक ३०ऑक्टोंबर, २०११ रोजी परिवहनच्या कार्यशाळा विभागाच्या विश्रांतीगृहास अचानक भेट दिली असता त्याठिकाणी मेकॅनिक दिनेश शिंदे, श्रीकांत केतकर, मदतनीस विवेक खोत, रमेश थोरात, तुषार गुप्ते आणि रामचंद्र गडग आदी कर्मचारी जेवणाची वेळ संपल्यानंतरही विश्रांती घेताना आढळले. या सर्व कर्मचा-यांना तात्काळ निलंबित करण्याची कारवाई करण्यात आली.

---

# ठाणे महानगरपालिका

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

**वृत्तविशेष क्र.१ ३ ३** दिनांक : १ नोव्हेंबर, २०११.

## ८ नोव्हेंबर रोजी महापालिका लोकशाही दिनाचे आयोजन

**ठाणे ( १ ) :** नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा जलदगतीने व्हावा यासाठी शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. माहे नोव्हेंबरमध्ये सोमवार दिनांक ७ नोव्हेंबर, २०११ रोजी बकरी ईद निमित्त कार्यालयास

सार्वजनिक सुट्टी असल्याने मंगळवार दिनांक ८ नोव्हेंबर, २०११ रोजी ठाणे महानगरपालिकेतर्फे लोकशाही दिन आयोजित करण्यात येणार आहे. सकाळी १०.०० ते १२.०० या वेळेत महापालिका आयुक्त यांचे कार्यालय, दुसरा मजला येथे हा लोकशाही दिन महापालिका आयुक्त आर. ए. राजीव यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

या लोकशाही दिनामध्ये ज्यांना आपली निवेदने सादर करावयाची आहेत त्यांनी सदर दिवशी उपस्थित राहून तीन प्रतींमध्ये आपली निवेदने महापालिका आयुक्त यांना सादर करावीत. लोकशाही दिनातील निवेदन सकाळी ९.०० वाजल्यापासून स्विकारली जातील. अन्य व्यक्तींमार्फत केलेली तक्रार लोकशाही दिनी स्विकारली जाणार नाही. तसेच तक्रारदारांबरोबर त्रयस्थाने येण्याची आवश्यकता नाही.

अर्जदाराने एका अर्जात एकच तक्रार सादर करावी. एकापेक्षा जास्त तक्रारी असलेला अर्ज स्विकारला जाणार नाही. त्याचप्रमाणे आस्थापना विषयक, विविध न्यायालयात, लोकआयुक्त यांचेकडे प्रलंबित असलेल्या प्रकरणाच्या तक्रारी, माहिती अधिकार कक्षेत येणारी प्रकरणे, तसेच राजकीय पक्षाच्या, नगरसेवकांच्या, संस्थेच्या लेटरहेडवरील अर्ज स्विकारला जाणार नाही असे आवाहन माहिती व जनसंपर्क अधिकारी संदीप माळवी यांनी केले आहे.

---


**ठाणे महानगरपालिका**

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com


---

**वृत्तविशेष क्र.१३४** दिनांक : १ नोव्हेंबर, २०११.

## आजपासून रंगायतनमध्ये रंगणार बालनाटय महोत्सव

**ठाणे (१) :** ठाणे शहराचा कलेचा वारसा जतन करतानाच बालमनातील सुप्त कला-गुणांना प्रोत्साहन देण्यासाठी ठाणे महानगरपालिकेच्यावतीने दरवर्षी बालनाटय महोत्सवाचे आयोजन केले जाते.

बालमित्रांसाठी पर्वणी ठरणा-या या महोत्सवाचे यावर्षी दिनांक २ आणि ४ नोव्हेंबर, २०११ रोजी आयोजन करण्यात आले आहे. महापौर अशोक बारकू वैती यांच्या हस्ते या महोत्सवाचे सकाळी ९.०० वाजता राम गणेश गडकरी रंगायतन येथे उद्घाटन होत आहे.

या बालनाटय महोत्सवाच्या निमित्ताने हौशी व व्यावसायिक बालनाटय संस्थांकडून अर्ज मागविले जातात आणि निवड झालेल्या संस्थांची नाटकं बालमित्रांसमोर सादर केली जातात. या वर्षी संधी निकेतन संस्था - 'अरेच्या कमाल आहे/गेट सेट गो', साई स्पर्श संस्था - 'राजाचा वाजला बाजा', दामोदर प्रॉड, नाशिक - 'शुभं करोती/श्यामची आई', श्री नाटय बालरंगभूमी, नाशिक - 'जादूचा शंख/झाली काय गम्मत' इत्यादी नाटयप्रयोग बालप्रेक्षकांसाठी सादर करण्यात येणार आहेत.

या महोत्सवाच्या सांगता समारंभ दिनांक ४ नोव्हेंबर, २०११ रोजी आमदार व शिवसेना ठाणे जिल्हा प्रमुख एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते, खासदार संजीव नाईक, आनंद परांजपे, आमदार संजय केळकर, राजन विचारे, प्रताप सरनाईक, जितेंद्र आव्हाड, सुभाष भोईर, उपमहापौर मनोज लासे, स्थायी समिति सभापती गणेश साळवी, सभागृह नेते पांडुरंग पाटील, विरोधी पक्षनेते नजीब मुल्ला, क्रीडा समिती सभापती संतोष वडवले आदी मान्यवर उपस्थितीत महापौर अशोक बारकू वैती यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे.

सदरचा बालनाटय महोत्सव ३ ते १२ वयोगटातील बालप्रेक्षकांसाठी विनामुल्य असून, जास्तीतजास्त बालमित्रांनी या महोत्सवाचा लाभ घ्यावा असे आवाहन महापालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

---

**ठाणे महानगरपालिका**

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

---

**वृत्तविशेष क्र. १३५** दिनांक : २ नोव्हेंबर, २०११.

# बालमित्रांच्या झुंबडमध्ये 'बालनाटय' महोत्सवास प्रारंभ

**ठाणे ( २ ) :** दिवाळीच्या सुट्टीचा आनंद द्विगुणित करण्याबरोबरच बालमनातील सुप्त कला-गुणांना वाव देण्या-या ठाणे महानगरपालिकेच्या बालनाटय महोत्सवास बालमित्रांच्या उत्साही सहभागाने प्रारंभ झाला.

बालगोपालांच्या जल्लोषामध्ये महापौर अशोक बारकू वैती यांनी आकाशात फुगे सोडून या महोत्सवाला चार चाँद लावले. यावेळी उपमहापौर मनोज लासे, क्रीडा समिती सभापती संतोष वडवले, माहिती व जनसंपर्क अधिकारी संदीप माळवी आदी उपस्थित होते.

राम गणेश गडकरी रंगायतन येथे दिनांक २ नोव्हेंबर आणि ४ नोव्हेंबर असे दोन दिवस हा महोत्सव चालणार असून, आज पहिल्या दिवशी राष्ट्रीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेले - 'अरेच्या कमाल आहे/गेट सेट गो' - संधी निकेतन संस्था व 'राजाचा वाजला बाजा' साई स्पर्श संस्थांनी आपले नाटयप्रयोग सादर करुन मुलांमध्ये उत्साह निर्माण केला.

बालनाटय महोत्सवा समारोप दिनांक ४ नोव्हेंबर, २०११ रोजी होणार असून या समारंभाला आमदार व शिवसेना ठाणे जिल्हा प्रमुख एकनाथ शिंदे, खासदार संजीव नाईक, आनंद परांजपे, आमदार संजय केळकर, राजन विचारे, प्रताप सरनाईक, जितेंद्र आव्हाड, सुभाष भोईर, उपमहापौर मनोज लासे, स्थायी समिती सभापती गणेश साळवी, सभागृह नेते पांडुरंग पाटील, विरोधी पक्षनेते नजीब मुल्ला, क्रीडा समिती सभापती संतोष वडवले आदी मान्यवर उपस्थितीत राहणार आहेत. महापौर अशोक बारकू वैती यांच्या अध्यक्षतेखाली हा समारंभ संपन्न होणार आहे.

---

**फोटो ओळ :** १ ) बालगोपालांसमवेत आकाशात फुगे सोडून महापौर अशोक बारकू वैती यांनी बालनाटय महोत्सवाचे उद्घाटन केले. यावेळी उपमहापौर मनोज लासे, क्रीडा समिती सभापती संतोष वडवले, माहिती व जनसंपर्क अधिकारी संदीप माळवी आदी उपस्थित होते.

२ ) बालनाटय महोत्सवामध्ये नाटयप्रयोग सादर करताना बालकलाकार.

**ठाणे महानगरपालिका**

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

---

**वृत्तविशेष क्र. १३६** दिनांक : २ नोव्हेंबर, २०११.

**<u>ठाणे महापौर चषक छायाचित्र स्पर्धा 'अविष्कार-२०११'</u>**

**महापौर अशोक बारकू वैती यांनी केले प्रदर्शनाचे उद्घाटन**

**ठाणे (२) :** ठाणे महानगरपालिकेच्यावतीने आणि फोटो सर्कलच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या 'अविष्कार २०११' ठाणे महापौर चषक छायाचित्र स्पर्धा व प्रदर्शनाचे उद्‌घाटन महापौर अशोक बारकू वैती यांच्या हस्ते आणि ज्येष्ठ छायाचित्रकार श्याम मलुष्टे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. या समारंभास सभागृह नेते पांडुरंग पाटील, क्रीडा समिती सभापती संतोष वडवले, माजिवडा-मानपाडा प्रभाग समिती अध्यक्ष राजेश सारंग आदी मान्यवर उपस्थित होते.

या निमित्ताने प्रदर्शन कालावधी दरम्यान युवराज गुर्जर (आफ्रीकन वाईल्ड लाईफ), अंजेलो डिसिल्वा (रोम-स्विडन), शिरीष साने (वारी), वेदवती पडवळ (इंडीयन वाईल्ड लाईफ) आदी मान्यवर छायाचित्रकारांच्या स्लाईड-शोचे आयोजन करण्यात आले आहे. तरी ठाणे कला भवन येथे होणा-या 'अविष्कार-२०११' या कार्यक्रमाला नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन ठाणे महानगरपालिका व फोटो सर्कल सोसायटीच्यावतीने करण्यात आले आहे.

---

**फोटो ओळ :** 'अविष्कार २०११' ठाणे महापौर चषक छायाचित्र स्पर्धा व प्रदर्शनाचे उद्‌घाटन प्रसंगी महापौर अशोक बारकू वैती सोबत ज्येष्ठ छायाचित्रकार श्याम मलुष्टे, सभागृह नेते पांडुरंग पाटील, क्रीडा समिती सभापती संतोष वडवले, माजिवडा-मानपाडा प्रभाग समिती अध्यक्ष राजेश सारंग आदी मान्यवर उपस्थित होते.


**ठाणे महानगरपालिका**

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com


**वृत्तविशेष क्र.१३७** दिनांक : ५ नोव्हेंबर, २०११.

**बेगम परवीन सुलतानासह नामवंत कलाकारांचा सहभाग**

**७ नोव्हेंबरपासून पं. राम मराठे स्मृती समारोहास प्रारंभ**

# यावर्षीपासून पं. राम मराठे स्मृती पुरस्कार

**ठाणे (५)** : आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या गायिका बेगम परवीन सुलताना, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संतूर वादक पं. सतीश व्यास यांच्यासह अनेक नामवंतांच्या सहभागाने यावर्षीचा संगीतभूषण पं. राम मराठे संगीत स्मृती समारोह सजणार आहे. दरम्यान गतवर्षी महापौर अशोक बारकू वैती यांनी जाहिर केल्याप्रमाणे यावर्षी पासून शास्त्रीय संगीतातील नामवंत कलाकाराचा संगीतभूषण पं. राम मराठे स्मृती पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार आहे.

ठाणे महानगरपालिकेच्यावतीने आणि अ. भा. नाटय परिषदेच्या सहकार्याने सोमवार दिनांक ७ नोव्हेंबरपासून १८व्या पं. राम मराठे संगीत समारोहास प्रारंभ होत असून नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन महापौर अशोक बारकू वैती यांनी केले आहे.

या संगीत स्मृती समारोहाचे उद्‌घाटन शिवसेना ठाणे जिल्हा प्रमुख आमदार एकनाथ शिंदे यांच्या हस्ते, आमदार राजन विचारे, आमदार प्रताप सरनाईक, आमदार जितेंद्र आव्हाड, आमदार संजय केळकर, आमदार सुभाष भोईर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत व महापौर अशोक बारकू वैती यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. यावेळी महापालिका आयुक्त आर. ए. राजीव, उपमहापौर मनोज लासे, स्थायी समिती सभापती गणेश साळवी, सभागृह नेते पांडुरंग पाटील, विरोधी पक्षनेते नजीब मुल्ला आणि क्रीडा समिती सभापती संतोष वडवले आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या संगीत स्मृती समारोहाचे पहिले पुष्प गुंफणार आहेत तरुण आणि ख्यातनाम तबलावादक सत्यजित तळवलकर. अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कलाकारांना साथ करणा-या सत्यजित तळवलकर यांच्या तबला वादनाची जादू संगीत रसिकांना ऐकावयास मिळणार आहे. त्यानंतर नृत्य आणि अभिनयात आपला वेगळा ठसा उमटविणा-या आदिती भागवत यांच्या कथ्थक नृत्याचा कार्यक्रम होणार आहे. पहिल्या दिवशीचे शेवटचे सत्र गानसरस्वती श्रीमती किशोरी अमोणकर यांची शिष्या सौ. नंदिनी बेडेकर यांच्या गायनाने सजणार आहे.

पं. राम मराठे संगीत स्मृती समारोहाचा दुसरा दिवस उजाडणार आहे तो ‘जय जय गौरी शंकर’ या नाटकाने. श्री आर्यादुर्गा क्रियेशन्स या संस्थेच्यावतीने दुपारी ४.०० वा. हे संगीत नाटक सादर करण्यात येणार असून यामध्ये प्रसिध्द गायक पं. मुकुंद मराठे यांची प्रमुख भूमिका आहे. तर रात्रीच्या सत्रामध्ये मोहन पेंडसे यांचे व्हायोलियन वादन ठेवण्यात आले आहे. दुस-या सत्रात प्रसिध्द गायक पं. शौनक अभिषेकी यांचे सुश्राव्य गायन ऐकण्याचा योग ठाणेकर रसिकांना मिळणार आहे. तर आंतरराष्ट्रीय कीर्तीचे संतूर वादक पं. सतीश व्यास यांच्या संतूर वादनाने या दिवसाच्या शेवटच्या सत्राचा समारोप होणार आहे.

२/-



प्रसिध्द बासरीवादक प्रविण गोडखिंडी (बंगलोर) यांच्या बासरीच्या धूनने या महोत्सवाचा तिसरा दिवस सजणार आहे. जगभरात बासरीचे प्रयोग करणा-या श्री. गोडखिंडी यांचा ठाण्यात पहिल्यांदाच कार्यक्रम होत आहे. त्यानंतरचे सत्र ख-या अर्थाने गाजणार आहे ते अल्पावधीत आंतरराष्ट्रीय पातळीवर शास्त्रीय गायनामध्ये आपला ठसा उमटविणा-या कोलकत्ताच्या कौशिकी चक्रवर्ती यांच्या गायनाने. आजच्या काळातल्या आघाडीच्या शास्त्रीय गायिका असलेल्या श्रीमती कौशिकी यांचे गायन ऐकण्याची संधी पहिल्यांदाच ठाणेकरांना लाभणार आहे.

समारोहाच्या चौथ्या दिवशी दुपारी अ. भा. मराठी नाटय परिषदेच्या ठाणे शाखेमार्फत ‘जय शंकरा विद्याधरा’ हा सांगितीक कार्यक्रम सादर करण्यात येणार असून रात्रीच्या सत्राची सुरुवात पं. भीमसेन जोशी यांचे शिष्य सुधाकर चव्हाण (पुणे) यांच्या गायनाने होणार आहे.

या समारोहाचा समारोप आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या गायिका बेगम परवीन सुलताना यांच्या गायनाने होणार आहे. बेगम परवीन सुलताना यांचे सूर ऐकण्याचा दुग्धशर्करा योग यावर्षी पं. राम मराठे

संगीत स्मृती समारोहाच्या निमित्ताने ठाण्याच्या चोखंदळ संगीतप्रेमींना लाभणार आहे. यावेळी ठाणे महानगरपालिकेच्यावतीने देण्यात येणा-या पं. राम मराठे स्मृती पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. रोख रु. २५ हजार, मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. पुरस्काराचे हे प्रथम वर्ष असून शास्त्रीय संगीतामध्ये उल्लेखनिय कामगिरी करणा-या नामवंत कलाकाराचा या पुरस्काराने सन्मान करण्यात येणार आहे. सदरचा महोत्सव सर्व नागरिकांसाठी विनामुल्य असून या समारोहाचा ठाणेकर नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन महापौर अशोक बारकू वैती यांनी केले आहे.

---


**ठाणे महानगरपालिका**

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com


**वृत्तविशेष क्र.१३८** दिनांक : ५ नोव्हेंबर, २०११.

## महापौर-आयुक्तांनी दिल्या ईदच्या शुभेच्छा !

**ठाणे (५) :** ठाण्याचे प्रथम नागरिक महापौर श्री. अशोक बारकू वैती आणि महापालिका आयुक्त श्री.आर. ए. राजीव यांनी सर्व मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

---

**ठाणे महानगरपालिका**

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

---

**वृत्तविशेष क्र.१३८** दिनांक : ५ नोव्हेंबर, २०११.

## <u>महापौर-आयुक्तांनी दिल्या ईदच्या शुभेच्छा !</u>

**ठाणे (५) :** ठाण्याचे प्रथम नागरिक महापौर श्री. अशोक बारकू वैती आणि महापालिका आयुक्त श्री.आर. ए. राजीव यांनी सर्व मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

---

**ठाणे महानगरपालिका**

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

---

**वृत्तविशेष क्र.१३९** दिनांक : ८ नोव्हेंबर, २०११.

## महापालिका लोकशाही दिनात ४३ निवेदने प्राप्त

**ठाणे (८) :** ठाणे महानगरपालिकेच्या आज झालेल्या लोकशाही दिनामध्ये नागरिकांच्या एकूण ४३ तक्रारी प्राप्त झाल्या. यावेळी महापालिका आयुक्तांनी ७ प्रकरणावर अंतिम निर्णय दिला तर उर्वरीत प्रकरणांबाबत तातडीने अंतिम कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

या महापालिका लोकशाही दिनामध्ये सर्वाधिक तक्रारी शहर विकास विभागाशी निगडीत होत्या. एकूण १२ नागरिकांनी शहर विकास विभागाविषयी निवेदने सादर केली. तर अतिक्रमण विभाग-८, कर विभाग-२, सार्वजनिक बांधकाम विभाग-१, उपआयुक्त परिमंडळ-१ कार्यालय - १, उपआयुक्त परिमंडळ-२ कार्यालय -७, माहिती व जनसंपर्क विभाग -१, स्थावर मालमत्ता विभाग-१, आरोग्य विभाग -१, अतिरिक्त आयुक्त कार्यालय -१, समाज विकास विभागाशी संबंधित १ निवेदन होते.

यावेळी महापालिका आयुक्त श्री. राजीव यांनी सर्व प्रकरणांवर संबंधित विभाग प्रमुखांना एक महिन्याच्या आत अंतिम स्वरुपाची कार्यवाही करण्याचे आदेश दिले.

---

**फोटो ओळ :** महापालिका लोकशाही दिनी नागरिकांची निवेदने ऐकताना महापालिका आयुक्त आर.ए.राजीव, अतिरिक्त आयुक्त एल. आर. गुप्ता, नगर अभियंता के. डी. लाला, उपआयुक्त (मुख्यालय) बालाजी खतगांवकर, उपआयुक्त दिपक चव्हाण, माहिती व जनसंपर्क अधिकारी संदीप माळवी, महापालिका अधिकारी व नागरिक.

**ठाणे मानगरपालिका**

माहिती व जनसंपर्क विभाग

E-mail - publicrelationtmc@gmail.com

---

**वृत्तविशेष क्र. १४०** दिनांक : ८ नोव्हेंबर, २०११

## संगीतभूषण पं. राम मराठे संगीत समारोहाची सुरूवात
## दिग्गज कलाकारांनी गाजविला पहिला दिवस

**ठाणे (८)** - आजचा आघाडीचा तबलावादक सत्यजित तळवलकर याची तबल्यावरील जादूई तिरकिट धा, सौ. नंदिनी बेडेकर यांचे सुश्राव्य गायन आणि त्यानंतर आजची आघाडीची कत्थक नृत्यांगना आदिती भागवत यांनी आपल्या नृत्याविष्काराने चढविलेला कळस यामुळे संगीतभूषण पं. राम मराठे संगीत स्मृती समारोहाचा पहिला दिवस गाजला.

ठाणे महानगरपालिकेच्यावतीने आणि अ. भा. नाट्य परिषदेच्या सहकार्याने राम गणेश गडकरी रंगायतन येथे १८व्या संगीतभूषण राम मराठे संगीत स्मृती संगीत समारोहाचे काल महापौर अशोक बारकू वैती यांच्या उद्घाटन झाले. यावेळी उपमहापौर मनोज लासे, सभागृह नेते पांडुरंग पाटील, क्रीडा समिती सभापती संतोष वडवले, ज्येष्ठ अभिनेते रवि पटवर्धन, प्रसिद्ध तबलावादक पं. भाई गायतोंडे, ज्येष्ठ नगरसेवक अनिल सावे, नाट्य परिषदेचे कार्यवाह विद्याधर ठाणेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आपल्या शुभेच्छापर भाषणात महापौर अशोक बारकू वैती यांनी महानगरपालिकेच्यावतीने चालविण्यात येणा-या या संगीत समारोहाचा नागरिकांनी मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा असे सांगितले. तसेच गतवर्षी जाहिर केल्याप्रमाणे यावर्षी शास्त्रीय संगीतातील नामवंताचा पं. राम मराठे स्मृती पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार असल्याचेही त्यांनी जाहिर केले.

उद्‌घाटकीय समारंभानंतर कार्यक्रमाची सुरूवात आजचा आघाडीचा तबलावादक सत्यजित तळवलकर यांच्या तबला वादनाने झाली. तबल्यावरील त्यांच्या जादुई तिरकीट धाने संगीत रसिकांना त्यांनी खिळवून ठेवले. त्यानंतर गानसरस्वती किशोरी अमोणकर यांच्या शिष्या सौ. नंदिनी बेडेकर सुश्राव्य गायनाने ही रंगत अधिकच वाढविली. सत्यजित तळवलकर यांच्या तबलल्याच्या तिरकीट धाच्या जादूई अविष्कारानंतर आपल्या नृत्याविष्काराने या महोत्सवाला एका उंचीवर नेऊन ठेवले. कत्थकमधील त्यांचे विविध प्रयोग रसिकांची वाहवा मिळवून गेले. त्यांना तबल्याची साथ पं. कालीनाथ मिश्रा, गायनाची साथ प्रसिद्ध गायिका सायली तळवलकर, हार्मोनियमवर श्री. फडके आदींनी केली.

दिनांक १० नोव्हेंबरपर्यंत हा समारोह चालणार असून हे सर्व कार्यक्रम रसिकांसाठी विनामूल्य असल्याने रसिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन महानगरपालिकेच्यावतीने करण्यात आले आहे.

---

**फोटो ओळ**: १.

१८व्या संगीतभूषण पं. राम मराठे स्मृती संगीत समारोहाचे उद्‌घाटन महापौर अशोक बारकू वैती यांच्या हस्ते झाले. यावेळी उपमहापौर मनोज लासे, सभागृह नेते पांडुरंग पाटील, क्रीडा समिती सभापती संतोष वडवले, ज्येष्ठ अभिनेते रवि पटवर्धन, प्रसिद्ध तबलावादक पं. भाई गायतोंडे, ज्येष्ठ नगरसेवक अनिल सावे, नाट्य परिषदेचे कार्यवाह विद्याधर ठाणेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

२. संगीतभूषण पं. राम मराठे स्मृती संगीत समारोहातील पहिले पुष्प गुंफताना प्रसिद्ध तबलावादक सत्याजित तळवलकर तर नत्याविष्कार करताना आदिती भागवत.